पाक्षिक | वार्षिक वर्गणी रु. ३० | किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे | अंक ९ वा | ६ सप्टेंबर १९९४

# आता कुटुंबकल्याणाचे कल्याण

— शरद जोशी

## बुखारेस्ट ते कैरो

सगळ्या क्षेत्रात कुचकामी ठरलेली शासन व्यवस्था स्वतःकडे भलतीच मोठी जबाबदारी घेऊ पहात आहे. आरोग्य आणि शिक्षण या विषयांत सरकारची काही विशेष जबाबदारी आहे, असे पंतप्रधानांनी जाहीर केलेच आहे. बरोबरीने कुटुंबकल्याणातही मोठ्या प्रमाणावर हात घुसवण्याचे घाटते आहे, त्यासाठी मोठे आंतरराष्ट्रीय कारस्थान शिजते आहे.

सप्टेंबर १९९४ मध्ये कैरो शहरी संयुक्त राष्ट्र संघातर्फे लोकसंख्याविषयक दुसरी जागतिक परिषद भरणार आहे. वीस वर्षांपूर्वी बुखारेस्ट येथे या विषयावरील पहिली जागतिक परिषद भरली त्यावेळी, म्हणजे १९७४ साली जगाची लोकसंख्या ४०० कोटी होती. दरवर्षी ती ८ कोटीने वाढत होती. लोकसंख्येच्या या महापुरावर तोडगा काढणे हा आणिबाणीचा प्रश्न समजून बुखारेस्ट येथे त्यावर चर्चा झाली. लोकसंख्यावाढीला आळा घालण्यासाठी केवळ कुटुंबनियोजन करून भागणार नाही; व्यापक आर्थिक-सामाजिक कार्यक्रम राबवावा लागेल, स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावला पाहिजे, आरोग्यसेवा सहजपणे उपलब्ध झाल्या पाहिजेत आणि गरीबी हटवली पाहिजे असे दूरदर्शी ठराव करण्यात आले. या ठरावांचा लोकसंख्या प्रश्नावरील जगभरच्या विचारधारेवर मोठा प्रभाव पडला होता.

## लेकुरे उदंड जाहली

बुखारेस्ट परिषदेनंतरच्या दोन दशकांत आफ्रिकेतील काही देश सोडल्यास एकूण जगातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची टक्केवारी कमी झाली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीने अन्नधान्याचे उत्पादन वाढले आहे. सर्वसाधारण माणसाच्या जेवणाची प्रत सुधारली आहे. स्त्रियांच्या दर्जाचा प्रश्न आता महत्त्वाचा मानला जातो. महिलाविषयक आदिसअबाबा जागतिक परिषदेनंतर स्त्रियांच्या प्रश्नाबद्दलची जाणीव वाढली आहे. कुटुंबनियोजन आणि गर्भनिरोध, गर्भपात या विषयांची चर्चा करताना कोणाचा जीव घाबरा होत नाही. उलट, निरोधाच्या साधनांच्या सार्वजनिक जागी लावलेल्या प्रचंड जाहिराती थोड्या कमी स्पष्ट असतील तर बरे अशी परिस्थिती झाली आहे.

बुखारेस्ट येथे सुचवलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी बऱ्यापैकी झाली आणि तरीही लोकसंख्येचा प्रश्न अधिकच भेडसावणारा झाला आहे. जगाची लोकसंख्या आज ५६० कोटी आहे, आणि दरवर्षी नऊ कोटीने ती वाढते आहे. येत्या ५० वर्षांत जगाची लोकसंख्या दुप्पट झाली तर एवढ्या तोंडांना खाऊ घालण्यास पुरेसे अन्न, पिण्यास पुरेसे पाणी, एवढेच काय, श्वास घेण्यासाठी पुरेशी स्वच्छ हवा यांचा पुरवठा पडेल किंवा नाही याबद्दल जबरदस्त शंका आहे.

**५ सप्टेंबर १९९४ पासून कैरो येथे संयुक्त राष्ट्रसंघातर्फे लोकसंख्याविषयक दुसरी जागतिक परिषद सुरू झाली आहे. ही परिषद होणार आणि त्यात इंडियासरकार तयारीने भाग घेणार हे निश्चित झाल्याबरोबर पंधरवड्यापूर्वी श्री. शरद जोशी यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया.**

या काळात कुटुंबनियोजनाचे कार्यक्रमही मोठ्या प्रमाणात ताकदीने राबवले गेले. कुटुंबनियोजनाची साधने सहज उपलब्ध झाली, कुटुंबनियोजन करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळाले, कुटुंब वारेमाप वाढू देणाऱ्यांना काही शिक्षा-दंड बसला, कुटुंबनियोजनाच्या आवश्यकतेचा जोरदार प्रचार झाला, तरीही लोकसंख्याच्या वाढीची गती फारशी कमी झालेली नाही. दारिद्र्य कमी झाले; कुटुंबनियोजनाचे कार्यक्रम राबवले गेले, पण लोकसंख्येची समस्या काही आटोक्यात आली नाही. याच्या कारणांचा शोध कैरो परिषदेत घेतला जावा अशी अपेक्षा होती.

'एक या दो बस्', 'आम्ही दोन, आमचे दोन' इत्यादि घोषणा प्रचाराच्या हरएक माध्यमातून कानावर, डोळ्यावर आदळत आहेत. मुलींचे विवाहाचे किमान वय १८ वर्षे करण्यात आले आहे. संजय गांधींच्या काळात नसबंदी करणाऱ्याला मर्फी रेडिओ, रोख बक्षिस आणि न करणाऱ्याची सक्तीने नसबंदी असाही कार्यक्रम राबवला गेला, पण फारसा यशस्वी झाला नाही. उलट, लोकांची प्रतिक्रिया इतकी कठोर की लेकाच्या कर्तबगारीची किंमत आईला द्यावी लागली आणि सारे सरकार कोसळून पडले. कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाची सक्तीची अंमलबजावणी करणाऱ्या चीनसारख्या देशातही तो फारसा यशस्वी झाला नाही.

तरीही प्रत्यक्षात संजय गांधी पद्धतीच्या नियोजनाची तरफदारी या परिषदेकडून करून घेण्याचे प्रयत्न चालू आहेत.

### गरीबांना पोरे जड वाटत नाहीत

बुखारेस्टनंतर, कुटुंबनियोजनाचे सगळ्यात चांगले साधन म्हणजे आर्थिक सुबत्ता अशा विचाराकडे जग झुकू लागले होते. आजपर्यंत कोणत्याही गरीब देशात लोकसंख्येची वाढ आटोक्यात आलेली नाही. गरीब आईबापांना एक मूल नवीन जन्मास घालण्यात खर्चापेक्षा लाभ जास्त आहे असे वाटते, तोपर्यंत कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम लोक कसोशीने राबवण्याची शक्यता नाही. जन्मलेले मूल रोगाने, आजाराने दगावणार नाही याची काही शाश्वती नसली की निदान दोन मुलगे आणि एखादी तरी मुलगी असावी अशी आईबापांची धारणा राहते. या उलट, संपन्नता आली, चांगले जीवन जगण्याची गोडी लागली की मुलांच्या संख्येपेक्षा त्यांची गुणवत्ता अधिक महत्त्वाची वाटू लागते आणि आईबापे कसोशीने नियोजन करतात. युरोप खंडातील आजच्या सुधारलेल्या देशांत एका काळी लोकसंख्या वाढीची गती अतिप्रचंड होती, इतकी की तेथील संततीने अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया असे प्रचंड खंड व्यापून टाकले. औद्योगिक क्रांतीनंतर संपन्नता आली आणि लोकसंख्या वाढण्याचे तर सोडाच, प्रत्यक्षात घटू लागली; लोकसंख्या वाढावी यासाठी सरकारे प्रयत्न करू लागली.

### नोकरशहांचे दुःख

हा अनुभव लक्षांत घेता, सुबत्ता हे सगळ्यात प्रभावी निरोधाचे साधन आहे, या विचाराला अधिकाधिक मान्यता मिळत आहे. या मान्यतेमुळे साहजिकच सरकारवाद्यांना मोठे दुःख झाले. लोकसंख्यावाढ हे दारिद्र्याचे कारण नाही, परिणाम आहे, असे म्हटले की तिसऱ्या जगातील सरकारांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जातात. लोकसंख्या हा विकासाप्रमाणेच आपोआप सुटणारा प्रश्न आहे, सरकारी लुडबुडीचे त्यांत काही प्रयोजन नाही, असे म्हटले तर सरकारशाहीवर व नोकरशाहीवर आघातच होतो. लोकसंख्या हा मोठा भयानक प्रश्न; तो हातळण्यासाठी एक वेगळे मंत्रालय पाहिजे; एक वेगळा आयोग पाहिजे, देशभर नोकरशाही संस्थांचे जाळे पाहिजे, मर्फी रेडिओ वाटण्याची व्यवस्था पाहिजे, नसबंदी किंवा टाकेबंदी केल्याबद्दल पैसे वाटण्याचा अधिकार नोकरदारांकडे पाहिजे, खोटे आकडे दाखवून पैसे गडप करता आले पाहिजे, अशी साहजिकच सरकारवाद्यांची इच्छा आहे.

कैरो येथे पुढील महिन्यात होणारी परिषद त्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. पर्यावरण, स्त्रीमुक्ती याप्रमाणे लोकसंख्येवर नियंत्रण ही सबब सरकारशाही अखंडितपणे पुढे चालवण्यासाठी सोयीस्कर आहे. हे बरोबर हेरून पावले टाकली गेली आहेत.

### भातशेती काय, लोकसंख्या काय?

कैरोची परिषद जवळ आली तसे भारताचे लोकसंख्याविषयक धोरण तयार करण्याची दिल्लीच्या सरकारी सदनात मोठी घाई उडाली. या विषयाचा अभ्यास करण्याकरिता एक समिती तातडीने नेमण्याचे ठरले. दिल्लीच्या सचिवालयात काही व्यावसायिक तज्ज्ञ मंडळी ठिय्या मारून बसलेलीच असतात. विषय कोणताही असो, तज्ज्ञांची समिती नेमायची आहे काय? आम्ही तयार बसलो आहोत असे म्हणणारी व्यावसायिक तज्ज्ञ मंडळी टपून बसलेलीच असतात. हनुमंतराव, स्वामीनाथन अशी मंडळी कोणत्याही एका वेळी दोनतीन समित्यांवर नेमली गेलेली असतातच. लोकसंख्याविषयक समिती नेमायचे ठरले आणि त्याचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली एम्. एस्. स्वामीनाथन यांची. भाताच्या नवीन जाती शोधण्याच्या क्षेत्रात काही संशोधन केलेले डॉक्टर स्वामीनाथन लोकसंख्या समितीचे अध्यक्ष बनले.

समितीने एक अहवालही देऊन टाकला. एका हातात गाजर, दुसऱ्या हातात छडी, एका हातात मर्फी रेडिओ, दुसऱ्या हातात नसबंदीची सुरी असल्या संजय गांधी तोंडवळ्याच्या धोरणाचा नवा अवतार स्वामीनाथन समितीने सुचवला आहे. कुटुंबकल्याणाचा कार्यक्रम निवृत्त लष्करी जवनांकडे असावा. दोनपेक्षा जास्त मुले असलेल्यांना सरकारी नोकरीत प्रवेश नसावा, निवडणुका लढविण्याचा अधिकार नसावा. दिल्ली येथे लोकसंख्या प्रश्न हातळण्यासाठी एक स्वायत्त महाआयोग असावा, अशा येनकेन प्रकारेण सरकार या संस्थेची बांडगुळे मजबूत करणाऱ्या शिफारशी स्वामीनाथन समितीने दिल्या आहेत.

नोकरशाहांखेरीज दुसरा एक गटही बुखारेस्ट परिषदेवर नाराज होता, नियोजनाची साधने तयार करणाऱ्या कारखानदारांचा. कुटुंबनियोजनाचे सर्वात प्रभावी साधन सुबत्ता आहे असे म्हटले की या कारखानदाऱ्यांच्या खजिन्यालाच हात घातल्यासारखे होईल. नोकरशहा आणि कारखानदारांचा एक गट कैरो येथील परिषदेत लोकसंख्येचे नियोजन सुबत्तासिद्ध नाही, त्यासाठी मोठी यंत्रणा उभारली पाहिजे असे दाखवण्याचा मोठा अटोकाट प्रयत्न करणार आहे.

### बादरायणी संबंध

संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रमुख सचिवालयातील लोकसंख्येच्या प्रश्नावरील विभागाच्या प्रमुख श्रीमतीजींनी स्वतःच याबाबतीत पुढाकार घेतला आहे. सचिवालयातर्फे कैरो परिषदेस सादर होणाऱ्या अहवालात सुबत्ता हेच सर्वात प्रभावी नियोजन या कल्पनेवर हल्ला करण्यात आला आहे असे कळते. त्यासाठी एक संख्या-शास्त्रीय अभ्यासाचा आधार घेतला असल्याचेही समजते. मेक्सिकोतून अमेरिकेत येऊन लॉस एंजलिस येथे स्थायिक झालेल्या कुटुंबांच्या पाहणीत त्यांची लोकसंख्यावाढीची गती मेक्सिकोत राहिलेल्या गरीब शेतकऱ्यांपेक्षा जास्त आहे असे दिसून आले. यावरून संपन्नतेमुळे लोकसंख्यावाढीची गती अधिक होते असे प्रतिपादन करण्याचा प्रयत्न तुटपुंज्या मोडक्यातोडक्या आकडेवारीच्या आधाराने करण्यात आला आहे.

एकट्या दुकट्या पाहणीवर एवढा मोठा निष्कर्ष काढणे संख्याशास्त्रास धरून नाही. एका देशातून दुसऱ्या देशात जाऊन सुबत्ता मिळवणाऱ्या लोकांची वागणूक देशातल्या देशातच विकास साधणाऱ्या लोकांसारखीच असेल असे गृहीत धरणेही चुकीचे आहे. संपन्नता मिळालेल्या कुटुंबात पहिल्या पिढीची वर्तणूक नव्या अनुभवाने

थोडी थोडी अस्ताव्यस्त होण्याची शक्यता असते, तसेच विदेशी स्थायिक झालेल्या पहिल्या पिढीचे असते. नवी संपन्नता टिकून राहणार आहे असा आत्मविश्वास आलेल्या नंतरच्या पिढीत मात्र मुलांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होतो. मेक्सिको ते लॉस एंजिलिस हे अंतर तसे लहान आहे. अमेरिकेत स्थायिक झालेले मेक्सिकन वारंवार आपल्या मायदेशी भेटीसाठी परततात. त्यांच्या पाहणीवरून काढलेला निष्कर्ष हिंदुस्थानी लोकांसारख्या लांबवरून येऊन स्थायिक झालेल्या, आणि पांच दहा वर्षांनी क्वचितच मायदेशी भेट देणाऱ्या कुटुंबांना लागू पडणार नाही. या साऱ्या गोष्टी अगदी स्पष्ट आहेत. तरीही मेक्सिकन लोकांच्या एका किरकोळ पाहणी अभ्यासाचा उपयोग बुखारेस्ट परिषदेचे सारे निर्णय उलथवण्यासाठी कैरो येथे होणार आहे.

**हा खेळ आगीशी**

या बंडामागे कुटुंबनियोजन क्षेत्रातील उद्योजक आहेत, संयुक्त राष्ट्रसंघाचे सचिवालय त्यांनी ताब्यात घेतलेले दिसते. देशोदेशीचे स्वामीनाथन आणि सरकारशाहीवादी त्यांच्यामागे उभे आहेत. कैरो परिषदेत गाजर-दंडा पद्धतीच्या उपायावर भर दिला जाईल. मध्यममार्गी तृतीयपंथी हिंदुस्थान सरकारला तो सोयीचा वाटेल. लोकसंख्या नियंत्रणाचा प्रश्न सरकारी यंत्रणेकडे राहिला तर येत्या ५० वर्षात लोकसंख्या दुप्पट होईल आणि अन्न, पाणी, हवा यांच्या पुरवठ्याचा गंभीर प्रश्न तयार होईल हे नक्की. ● ● ●

# शिक्षणातही खुली व्यवस्था हवी....

**(शिक्षण क्षेत्रात काही सुधारणा व्हावी अशी इच्छा असलेल्या व आयुष्यभर त्यासाठी व्यवस्थेच्या विरोधात आपल्या परीने एकाकी लढत आलेल्या श्री. कोल्हे यांनी आपले अनुभव व व्यथा व्यक्त करणारे एक सविस्तर पत्र लिहिले. त्याला श्री. शरद जोशी यांनी दिलेल्या उत्तरातील काही भाग)**

श्री. एल. सी. कोल्हे,
स. न. वि. वि.

शिक्षक, प्राध्यापक या वर्गाविषयी मी, अनेकदा लिहिले आहे; ते आपल्या वाचनांत आले आहे असे समजतो. प्राध्यापक, शिक्षक इत्यादी मंडळींना वारेमाप पगार मिळतात आणि ते देत असलेल्या शिक्षणाचा दर्जा त्यांच्या वेतनश्रेणींशी व्यस्तसंबंध ठेवतो. हे मत मी अनेकवेळा मांडतो. कदाचित् आवश्यकतेपेक्षा अधिक जहाल तऱ्हेने मांडतो; त्याचे एक कारण आहे.

माझ्या आयुष्याची सुरूवात मी प्राध्यापक म्हणून केली. त्यावेळी आणखी शंभर रुपये दरमहा जास्त मिळत असते तर आय.ए.एस. परीक्षेला बसण्याचा विचारसुद्धा केला नसता. प्राध्यापक, शिक्षक या मंडळींची पिढ्यान्‌पिढ्या कुतरओढ झाली यांत काही वाद नाही. पण गेल्या २५-३० वर्षांत शिक्षक-वर्गाने शतकानुशतके त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची पुरेपूर भरपाई करून घेतली आहे.

शिक्षण संस्थेत निवडणुका न होणे किंवा पुरा पगार दिला न जाणे या प्रकारांबद्दल आपल्या तीव्र भावना मी समजू शकतो. याकरिता आपण संघर्ष केला आहे आणि वेदनाही सहन केल्या आहेत.

पण; याचा अर्थ शिक्षण क्षेत्रांत संस्थांच्या अंतर्गत निवडणुका आणि पगार हेच सर्वांत महत्त्वाचे आणि ज्वलंत प्रश्न आहेत असे नाही. आजकाल शिक्षण संस्थांत मुले येतात ती शिकण्यासाठी नाही, पदवीचा शिक्का मिळविण्यासाठी. पदवी घेतल्यानंतर कोणी नोकरीपात्रही होत नाही; पण सरकार तबेल्यांत, शिक्का असलेले कोणतेही गाढव घोडा म्हणून स्वीकारले जाते. अशा शिक्षण संस्थांवर सरकारी प्रभाव असावा हे साहजिकच आहे. अशा संस्था सरकारी परवान्याने चालाव्यात हेही उघड. सगळाच चोरबाजार, त्यामुळे सत्तास्थाने हातात घेण्याकरिता सर्वांचीच धावपळ चालू. शिक्षण संस्थांतील अधिकारपदे पात्रतेच्या कोणत्या निकषावर दिली जावी? विद्या, व्यासंग, तपस्या आणि अध्यापनातील कौशल्य हे केवळ पोकळ शब्द राहिले. त्यामुळे विद्याक्षेत्रातही अधिकार निवडणुकांनी ठरू लागला हे केवढे भयानक!

विद्याक्षेत्रातील गुणवत्तेची मान्यता कोणत्या स्वरूपात दिली जावी? राजकीय सत्ता पाठीराख्यांच्या पायांची संख्या मोजून दिली जाते. आर्थिक क्षेत्रांत कदर पैशाने केली जाते. विद्वानांनाही पोट भरावे लागते यांत काही वाद नाही. तरीही आपली अर्हता रुपये-पैशांत मोजमाप व्हावी याला विद्वानांनी मान्यता द्यावी, एवढेच नव्हे तर तसा आग्रह धरावा ही त्याहूनही मोठी चिंतनीय गोष्ट आहे.

अर्थक्षेत्रांत प्रेरणा अर्थाची आहे. फायद्याच्या आशेने लोक अधिक धडपड करतात, मालाची प्रत सुधारतात, किंमती कमी करतात; पण हा नियम विद्याक्षेत्रांत लागू नाही हे उघड आहे. शिक्षकांचे पगार वाढले; पण व्यासंग आणि अध्यापन दोन्हींचा निकाल लागला. भर्तृहरी राजाच्या काव्यांत राजाच्या सत्तासंपत्तीस आव्हान देणाऱ्या निःसंग आणि निःस्पृह विद्वानांची अनेक वचने आहेत. त्या विद्वानांचे जग वेगळे; त्या जगातले सगळे अनुभव वेगळे, तिथली सुख-दुःखे वेगळी आणि मान्यताही वेगळ्या.

'विद्यासंस्था काढण्यास सरकारी मदतीची गरज नाही. ज्यांना पाहिजे त्यांनी काढावीत, अभ्यास आणि पदव्या यांनाही सरकारमान्यता नाही, अभ्यास पुरा केलेले विद्यार्थी नेमून घेण्याच्या पात्रतेच्या आहेत किंवा नाही याचा विचार नोकरी देणाऱ्याने करावा, विद्यार्थ्यांनी त्यांना आवडेल त्या शाळेत जावे, चांगले शिक्षक कदाचित् अधिक फी आकारतील किंवा अधिक हुशार मुले घेण्याचा आग्रह धरतील, कोणालाही केवळ प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली म्हणून अखिल भारतीय वेतनश्रेणीप्रमाणे वेतन मिळणार नाही.' माझ्या डोळ्यांसमोरील शिक्षणक्षेत्राचे स्वप्न असे विक्षिप्त आहे.

मनुष्य प्राण्याच्या विविध बुद्धींची आणि विविध अंगांची क्षेत्रे वेगवेगळी आहेत. शरद पवार, हर्षद मेहता आणि रँगलर परांजपे यांना एका मुशीत कोंबून बसविण्याचा अट्टाहास करण्याऱ्या आजच्या व्यवस्थेकडून शिक्षणक्षेत्राबद्दल अपेक्षा काय ठेवता येईल? शिक्षण क्षेत्राचा शासन व्यवस्थेशी यत्किंचितही संबंध राहणार नाही, ना मान्यतेकरिता ना पगाराकरिता, तेव्हा शिक्षण क्षेत्रांत जीवदान मिळाले असे होईल.

– शरद जोशी

# 'शिवार'ची वाटचाल

शिवार या नावाखाली सर्व तऱ्हेच्या मालाची विक्री करणाऱ्या दुकानांचे जाळे प्रथम महाराष्ट्रात आणि नंतर देशभर पसरवण्याची कल्पना प्रथमतः शेगांव येथील मेळाव्यात १० नोव्हेंबर १९९१ रोजी मांडण्यात आली. ही योजना लवकरात लवकर अमलात यावी आणि महाराष्ट्रात निदान दोन अडीच हजार दुकानांची साखळी तयार व्हावी अशी अपेक्षा शरद जोशी यांनी शेगांवच्या व्यासपीठावरून व्यक्त केली होती. त्याबरोबरच शरद जोशी यांनी असेही म्हटले होते की, शेतीमालाच्या भावासाठी लढा देणाऱ्या शेतकरी पाईकांनी खुल्या व्यवस्थेबरोबर येणाऱ्या नव्या युगात प्रक्रिया, व्यापार, निर्यात हाती घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण ते काम केले नाही तर शेतीबाहेरील व्यापारी, निर्यातदार, कारखानदार, बहुराष्ट्रीय कंपन्या या क्षेत्रात शिरतील, खुल्या व्यवस्थेची मलई त्यांच्या हाती पडेल. हा धोका टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी सजग झाले पाहिजे आणि सीता-शेती, मजघरशेती, निर्यातशेती याबरोबर व्यापारशेतीचीही क्रांती घडवली पाहिजे.

त्यांचे भाकीत अक्षरशः खरे ठरले आहे. शेतीमालाचा व्यापार, प्रक्रिया, निर्यात करणाऱ्या व्यावसायिक कंपन्या अक्षरशः शेकड्यांनी उभ्या रहात आहेत. शेगांवच्या भाकिताप्रमाणे या कंपन्या सहकारी संस्था नाहीत, पब्लिक लिमिटेड कंपन्या आहेत. अब्जावधि रुपयांचे भाग भांडवल त्या उभे करीत आहेत. इलेक्ट्रॉनिक्सच्या बरोबरीने शेतीव्यापार भरभराटीकडे जात आहे. द्राक्ष, स्ट्रॉबेरी असे किरकोळ अपवाद सोडले तर या क्षेत्रात शेतकरी अभावानेच दिसतो ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

'शिवार' अपेक्षित गतीने उभे राहिले नाही त्याची कारणे अनेक आहेत. ज्या खुल्या व्यवस्थेच्या आधाराने ही क्रांती घडून यायची ती खुली व्यवस्थाच डगमगू लागली. शेतकरी कार्यकर्ते पुन्हा एकदां जुनी हत्यारे काढून सरकारविरुद्ध रस्त्यावर उतरावे लागते काय अशा विवंचनेत पडले, शेगांवच्या चतुरंग शेतीचे काम मागे पडले.

दुसऱ्या काही प्रकल्पांत शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोठी कर्तबगारी दाखवली. चंद्रपूर, वर्धा जिल्ह्यांतील 'शेतकरी सॉल्व्हंट लि.' ही कंपनी शेतकरी संघटनेचे श्री. मोरश्वर टेमुर्डे, वसंतराव बोंडे, वामनराव चटप इत्यादी मंडळींनी यशस्वी करून दाखवली आणि अल्पावधीत १० रुपयांचा भांडवलभाग ३० रुपयांच्या वर जाऊन पोचला. परळी वैजनाथ येथील 'पवन प्रोटीन्स' या कंपनीनेही सार्वजनिक भागभांडवल जमा करण्याचा कार्यक्रम यशस्वी केला. 'शिवार' करिता शेतकऱ्यांचे भांडवल जितके अधिक तितका योजनेतून त्यांच्यापर्यंत पोहोचणाऱ्या नफ्याचा हिस्सा अधिक. हे लक्षात घेता शेतकऱ्यांकडूनच अधिकाधिक भांडवल जमा करण्याची योजना आखण्यात आली. तिचा पहिला हप्ता औरंगाबाद अधिवेशनात पुरा झाला. पण अजून एका दुसऱ्या टप्प्यात मोठ्या प्रमाणावर भागभांडवल जमा करणे आवश्यक होईल. यासंबंधी विस्ताराने पुढे लिहिले आहे.

पण तरीही 'शिवार'च्या प्रगतीबद्दल काहीशी निराशा अनेकांच्या मनांत आहे. शरद जोशींच्याही मनात ती आहे. औरंगाबाद येथे १०० रु. भरून नोंदणी केलेल्या अनेकांनी बाकीची रक्कम पाठवून दिलेली नाही. त्यांना पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात येत आहे. निदान ३० सप्टेंबर ९४ पर्यंत उर्वरीत रु. ९०० शिवार लिमिटेडच्या नागपूर कार्यालयात पाठवण्याची व्यवस्था करावी.

भांडवल उभारणीच्या दुसऱ्या फेरीत शेअर मिळावेत अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीही आजपासूनच आपली नावे नोंदवावी म्हणजे पुढील फेरीत त्यांना भाग देणे शक्य होईल. शेतकरी सॉल्व्हंटच्या भागांची किंमत वाढल्यानंतर ते मिळावेत म्हणून ते धडपड करतांना आता दिसतात. याची पुनरावृत्ति टाळायची असेल तर याचवेळी भाग मिळवणे योग्य होईल.

रकमेची पावती इत्यादीबद्दल कोणत्याही तऱ्हेची तक्रार असेल तर ती नागपूर कार्यालयासमोर ठेवावी.

शिवार आपणा सर्वांचे आहे. तेव्हा, त्याबद्दल अफवा पसरवण्याचा व कुचेष्टा करण्याचा प्रयत्न अनेकजण करीत आहेत त्यांना हातभार लावू नये.

'शिवार' ही काय कल्पना आहे? परदेशांत गृहोपयोगी मालाच्या खरेदीविक्रीची व्यवस्था दुपदरी, तिपदरी किंवा चौपदरीही असते. आपल्याप्रमाणेच गावोगावी, वस्तीवस्तीत छोटी किराणा मालाची, भाजीपाला, फळे यांची, पुस्तके वह्या प्रसाधने, औषधे यांची किरकोळ विक्रीची दुकाने असतातच. पण त्यापलिकडे, सगळ्याच गृहोपयोगी वस्तू शक्यतो एकाच छपराखाली ग्राहकांना उपलब्ध करून देणारी भांडारेही तेथे असतात. सध्याच्या पद्धतीच्या दुकानांना दुकान म्हणू या आणि इंग्रजीत ज्यांना सुपर मार्केट म्हणतात त्यांचा भांडार या सुटसुटीत शब्दाने उल्लेख करू या. या भांडारात मीठ-मिरचीपासून ते कापडचोपड, औषधे, पंखे, शिवण्याची यंत्रे इत्यादी त्या त्या भागातील ग्राहकांना हवा असणारा सगळा माल वर्गवारीने विक्रीसाठी मांडला जातो. ही भांडारे सगळीच काही सारखी नसतात, काही भांडारे त्यातल्यात्यात कमी उत्पन्नाच्या वर्गाच्या लोकांकरितां स्वस्त वस्तूंवर भर देतात, काही मध्यमवर्गाच्या गरजांकडे, काही उच्च मध्यम वर्गाकडे तर काही खास भांडारे श्रीमंत, गर्भश्रीमंतांच्याही गरजा पुरवतात. बहुतेक भांडारे किरकोळ विक्रीसाठी असतात,

काही भांडारे मोठ्या प्रमाणात घाऊक विक्री करण्यावरच विशेष भर देतात. परदेशातील गृहिणींना या भांडारात जाऊन खरेदी करणे मोठे सोयीचे आणि सुखावह वाटते. एकदा दुकानात शिरले की हातात टोपली किंवा गाडी घेऊन दुकानात सर्वत्र फिरावे किंवा पाहिजे त्या विभागाकडे जावे, आपल्याला पाहिजे त्या वस्तू उचलून घ्याव्या, भावाची घासाघीस नाही, गुणवत्तेची शंका नाही, बाहेर येतांना काऊंटरवर माल दाखवावा आणि एकरकमी पैसे द्यावे. वेळाची बचत, पैशाची बचत, खात्रीशीर गुणवत्ता, त्यामुळे भांडाराची एक मोठी चळवळ पश्चिमात्य देशात सर्वदूर पसरली आहे.

इंग्लडमध्ये 'Marks and Spencer' (मार्क्स अँड स्पेन्सर) ही एक जगविख्यात भांडारांची संस्था. या संस्थेने साध्या कामकरी बाईला एखाद्या उमराव स्त्रीप्रमाणे वेशभूषा करण्याची शक्यता निर्माण करून दिली. अशी या संस्थेची भलावण प्रख्यात साहित्यकार 'जॉर्ज मिकेश' यांनी केली आहे. गरीबांसाठी 'मार्क्स आणि स्पेन्सर' यांनी जितके केले तितके प्रख्यात समाजवादी धुरीण मार्क्स आणि एंगल्स यांनीही केले नाही असे तो म्हणतो.

या भांडारांच्या यशाच्या मागे रहस्य काय? हे रहस्य थोडक्यात, त्यांच्या उलाढालीच्या प्रचंड प्रमाणात आहे. उदा. मार्क्स अँड स्पेन्सरचे प्रतिनिधी नाशिक जिल्ह्यात आजकाल येतात. त्यांच्या सगळ्या शाखांना द्राक्षे पुरवायची म्हणजे पुऱ्या नाशिक जिल्ह्यात तयार होणारा माल केव्हांच संपून जाईल. एवढी मोठी ठोक खरेदी, पैसे मिळण्याची खात्री, विक्रीची दगदग नाही, तेव्हां उत्पादक आनंदाने माल देऊ करतात. मालाच्या गुणवत्तेच्या अटी कसोशीने पुऱ्या करण्यासाठी धडपडतात. फायदा उत्पादकांचाही होतो आणि ग्राहकांचाही.

कारखानदारी मालाच्या बाबतीत या भांडारांची काम करण्याची पद्धत मोठी समजून घेण्यासारखी आहे. समजा एक कारखानदार सायकली तयार करतो, भांडाराचे लोक त्याने तयार केलेल्या सायकलीचा तपशीलवार अभ्यास करतात. त्यात सुधारणा कशी करता येईल, उत्पादनखर्च कमी कसा करता येईल याचा बारकाईने अभ्यास करून कारखानदाराकडे जातात. त्याच्याकडे प्रस्ताव ठेवतात. तुमच्या मालात अमूक फरक केला तर त्याचा खर्च इतका कमी होईल, इतक्या किंमतीस विकणे तुम्हाला परवडेल, तुम्ही जितका माल तयार कराल त्याच्या निदान इतके टक्के माल आम्ही हमखास उचलू. पैसे जवळजवळ रोख. तुमच्या विक्रीचाही खर्च वाचेल, जाहिरातीचाही खर्च वाचेल. सध्याच्या घाऊक किंमतीच्या निम्म्या भावाने तुम्ही माल पुरवला तर तुमचा फायदा कितीतरी वाढेल. भांडारे अशा तऱ्हेने शेकडो कारखानदारांकडून आपल्या शिक्क्याचा माल तयार करून घेतात. ग्राहकाला त्याच्या गरजेनुसार चांगला माल स्वस्त भावांत मिळतो. उत्पादकांना मागणीची आणि पैशाची हमी मिळते. पाश्चिमात्य देशातील भरभराटीचे एक प्रमुख कारण 'भांडार चळवळ' हे आहे.

हिंदुस्थानात 'भांडार चळवळ' ही जवळजवळ अस्तित्वात नाही. मुंबईचे 'अपना बझार', दिल्लीतील दूध भाजीपाल्याकरितां उघडलेली 'मदर डेअरी'ची दुकाने, वारणा नगरच्या आसपास 'वारणा बझार' ने उघडलेल्या शाखा असे तुरळक अपवाद सोडले तर भांडारांची जाळी आपल्याकडे नाहीत. अनेक खाजगी दुकानदारांनी दुकानांची मांडणी बदलून भांडार पद्धतीच्या मांडणीची दुकाने काढली. कांही साखर-कारखानदारांनी एकटेदुकटे मोठे भांडार खोलले, पण भांडारांचे जाळे असे तयार करण्याचा प्रयत्नही झाला नाही. विविध गृहोपयोगी वस्तू एका छपराखाली गुणवत्ता आणि किमान किंमत या शाश्वतीने उपलब्ध करून देणे आणि त्याबरोबरच उत्पादकांनाही बाजारपेठेची आणि किंमतीची काही हमी मिळवून देणे हे 'शिवार' चे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्याच्या गावापर्यंत शिवारची शाखा खोलायचे म्हटले तर अडीचतीनशेवर आकडा जाईल. प्रत्येक बाजारपेठेच्या गांवी तेथील परिस्थितीनुसार यथायोग्य आकारमानाचे दुकान काढायचे म्हटले तर वेगवेगळ्या नमुन्याच्या हजार एक शाखा उघडाव्या लागतील. या दुकानांत सध्या दुकानांत मिळणाऱ्या धर्तीचा माल ठेवण्याची व्यवस्था करावी लागेल, त्याचबरोबर काही प्रसिद्ध प्रादेशिक माल सगळीकडे उपलब्ध करून देण्याचीही व्यवस्था करावी लागेल. उदा. मराठवाड्यातील दगडी ज्वारी, मावळातील आंबेमोहोर तांदूळ, वायगांवची हळद, संकेश्वरची मिरची, पंजाबातील नासपती इत्यादि. या पलिकडे जाऊन वेगवेगळ्या कारखानदारांकडून आपल्या आराखड्यानुसार माल तयार करून घेणे, त्यासाठी शेतीमालावर प्रक्रिया करणारे, माजघर शेती करणाऱ्या शेतकरी स्त्रिया आणि इतर कारखानदार यांच्याशी संपर्क साधणे हेही महत्त्वाचे आहे.

सगळ्यात महत्त्वाची आणि कठीण गोष्ट म्हणजे मालाच्या गुणवत्तेची परीक्षा करण्यासाठी सुसज्ज प्रयोगशाळा आणि तपासणी यांची व्यवस्था. 'शिवार' व्यवस्थापनाची योजना अशी आहे की, ॲगमार्क किंवा ISO 9000 पेक्षाही 'शिवार' हे नाव गुणवत्तेचा विश्वसनीय मानदंड बनावे.

परदेशी भांडारांच्या आराखड्यात आपल्या देशांतील कालमानाप्रमाणे काही फेरफार करावे लागतील. हिंदुस्थानात जागोजाग एकटी दुकटी भांडारे उभी राहिली पण भांडाराची जाळी उभी राहिली नाही. याचे महत्त्वाचे कारण असे की नोकरदारांच्या हाती सोपवलेल्या दुकानात नासधूस, अफरातफर इतकी होते की ती दुकाने बंद पडतात. 'शिवार' या अडचणीवर मात कशी काय करणार? यासाठी शिवारने एक वेगळी योजना आखली आहे. व्यापक उलाढालीचा फायदा तर सोडायचा नाही, पण प्रत्येक शाखेत व्यवस्थापन मात्र व्यक्तिगत राहील अशी दुहेरी योजना आखण्यात आली आहे. 'शिवार' ची प्रत्येक शाखा व्यक्तीच्या, भागीदाराच्या किंवा प्रायव्हेट लि. कंपनीच्या मालकीचीच असेल. त्या दुकानातील व्यवहार, मालाचा पुरवठा, विक्री यावरती देखरेख आणि निगराणी मालकाचीच राहील. या उलट मालाची गुणवत्ता, पुरवठा, पतपुरवठा, जाहिरात इत्यादी व्यवस्थापनाची अंगे

'शिवार' लि. तर्फे चालवली जातील.

'शिवार'च्या कामास आता काही ठोस सुरवात झाली आहे. 'शिवार'चे संचालक मंडळ म्हणून आपल्यापैकी खालील व्यक्तींची नेमणूक करण्यात आली आहे.

## MEMORANDUM OF ASSOCIATION

1. **Name of the Company :** Shivar Industries (India) Ltd.
2. **The Registered Office :** 402, Kamalprabha, Dhantoli, Nagpur - 440 012.
3. **The Board of Directors :**

| | | |
|---|---|---|
| 1. | Shri. Sharad Joshi<br>Ambethan, Tal. Khed, Dist Pune. | Chairman |
| 2. | Dr. Vasant L. Bonde<br>Janpath ward, Hinganghat,<br>Dist. Wardha | Director |
| 3. | Shri. Prakash G. Pohore<br>Nishant Towers, M. G. Road, Akola. | Director |
| 4. | Smt. Sarojtai R. Kashikar<br>Ramnagar, Wardha. | Director |
| 5. | Shri. Laxman M. Wange<br>Parli Vaijnath, Dist - Beed | Director |
| 6. | Shri. Vilasrao V. Kore<br>Savitri Nivas, Warnanagar<br>Dist. Kolhapur | Director |
| 7. | Shri. Laxmikant P. Deshmukh<br>Vijayanand Hous. Socy.<br>Dhantoli, Nagpur. | Executive Director |

4. **Auditors :** P. S. Thakare, Chartered Accountant, Nagpur
5. **The main objects of the company :** To Manufacture, Process, trade, distribution and export of Agro-based products and bye products.

आपल्या सर्वांच्या परिचयाचे शेतकरी संघटनेचे मराठवाडा व विदर्भ येथील धडाडीचे कार्यकर्ते आणि शेतीनिविष्ठांच्या व्यापारांचा व्यापक अनुभव असलेले श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांची प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. नागपूरजवळ बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत प्रक्रिया, निर्यात व घाऊक व्यवहार यासाठी एक भूखंड घेण्यात आला असून तेथील बांधकामाचा आराखडाही तयार आहे.

शेतकरी स्त्रियांनी घरी तयार केलेल्या 'माजघर शेती'च्या पदार्थांना देशी आणि आंतरराष्ट्रीय व्यापारपेठ मिळवून देणे हे 'शिवार'चे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी मुंबई व पुणे येथे जागतिक व्यवहार केंद्रात जागा मिळवण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. शिवारचे पहिले भांडार अकोला येथे सुरू होत आहे, त्यानंतर थोड्याच काळात आपणाकडे तीन भांडारे उघडली जातील.

सगळ्या कामाच्या व्यापातून 'शिवार' उभे राहत आहे. आपल्या सगळ्यांचे सहकार्य त्याला लाभावे.

**संचालक मंडळ**
शिवार इंडस्ट्रीज लिमिटेड

पत्ता : कमलप्रभा, धंतोली, नागपूर ४४० ०१२.

# शेतकरी महिला आघाडीच्या प्रयत्नाने नागपूर जिल्ह्यातील सहा दारूदुकाने बंद

नागपूर जिल्ह्याच्या काटोल तालुक्यातील दिग्रस बु. येथे गावातील शेतकरी महिला आघाडीच्या पुढाकाराने, नरखेड पंचायत समितीच्या माजी सभापती व शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्या सौ. दीप्ती काळमेघ यांच्या हस्ते बळिराज्य नगर फलकाचे उद्घाटन झाले. या वेळी शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर हजर होत्या.

औरंगबाद अधिवेशनातून वाघवाघिणी बनून बाहेर पडलेल्या दिग्रस बु. च्या शेतकरी स्त्रीपुरुषांनी मोठ्या निर्धाराने औरंगाबाद अधिवेशनाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी सुरू केली.

१०-१२ जणांच्या पथकासह आलेल्या विभागीय वसुली अधिकाऱ्याला गावाबाहेर पिटाळून लावले.

२८ मे १९९४ रोजी भरलेल्या ग्रामसभेमध्ये गावातील शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. गीताताई ढोकणे, उपाध्यक्षा सौ. सुशिलाबाई मनकवडे, सचिव सौ. कमलबाई काकडे व इतर कार्यकर्त्या तसेच शेतकरी संघटनेचे पुरुष कार्यकर्ते यांनी एकजूट दाखवून दारू दुकान बंदीचा ठराव संमत करून घेतला. हा ठराव अंमलात येण्यासाठी सातत्याने विविध पातळ्यांवर पाठपुरावा केला. अखेर ११/८/९४ रोजी उत्पादन शुल्क जिल्हा अधिक्षकांनी लोकसत्तेमध्ये जाहीर करून परवानाधारक दुकानदार व ग्रामपंचायत यांना हे दुकान महिन्याभराच्या आज बंद करण्याचे आदेश दिले.

दिग्रस बु. येथील दारू दुकानाबरोबरच कचारी सावंगा (ता. काटोल), खरसोली व लोहारी सावंगा (ता. नरखेड), तेलकामठी (ता. सावनेर) व बडोदा (ता. कामठी) येथील दुकानेही बंद करण्याचे आदेश उत्पादन शल्क जिल्हा अधिक्षकांनी दिले आहेत.

### नागपूर अधिवेशनाची तयारी

## नागपूर अधिवेशन कार्यालय कार्यरत

शेतकरी संघटना नागपूर जिल्हा व विदर्भातील कार्यकर्त्यांची बैठक नागपूर येथे २८ ऑगस्ट १९९४ रोजी पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल यांनी १२ नोव्हेंबरचे शेतकरी संघटना अधिवेशन यशस्वी करण्यासाठी लाखोंच्या संख्येने शेतकरी स्त्रीपुरुष यावेत यासाठी संपूर्ण महाराष्ट्र प्रचारकार्याने पिंजून काढण्याचे आवाहन उपस्थित कार्यकर्त्यांना केले. या बैठकीत शेतकरी संघटनेच्या या सहाव्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून श्री. पी. एस्. ठाकरे (सी.ए.) आणि कार्यध्यक्ष म्हणून श्री. राम नेवले यांची नियुक्ती केल्याचेही अध्यक्षांनी घोषित केले.

या बैठकीत श्री. मोरेश्वर टेमुर्डे यांनी शेतकरी संघटनेची राजकीय वाटचाल व 'स्वतंत्र भारत' पक्षाची आवश्यकता या विषयाची मांडणी केली. शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर यांनी सरकारी महिला आयोग व महिला धोरण यांविषयी शेतकरी महिला आघाडीची भूमिका मांडली.

त्याखेरीज सर्वश्री डॉ. वसंतराव बोंडे, राम नेवले, लक्ष्मीकांत देशमुख, बबनराव येवले, सौ. सुमनताई अग्रवाल, सौ. संध्या इंगोले यांचीही या बैठकीत भाषणे झाली. बैठकीचे संचालन नागपूर जिल्हाप्रमुख श्री. मदन कामडे यांनी केले. अधिवेशन तयारी व कामकाजाच्या दृष्टीने वेगवेगळ्या समित्या या बैठकीत तयार करण्यात आल्या. या बैठकीला तीनशेच्यावर कार्यकर्ते हजर होते.

१२ नोव्हेंबर १९९४ रोजी होणाऱ्या खुल्या अधिवेशनासाठी नागपूर येथील कस्तुरचंद पार्क ही जागा निश्चित करण्यात आली असून त्याबाबत रीतसर परवानगी जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळाली असल्याचे श्री. राम नेवले यांनी सांगितले.

अधिवेशनाचे संपर्क कार्यालय :

**अध्यापक भवन,**
**एस्. टी. स्टँड समोर,**
**गणेश पेठ, नागपूर ४४० ०१८.**
**फोन नं. ७२७८३६**
**फॅक्स : ०७१२-५२८१२७**

## शरद जोशींच्या यांचा नागपूर अधिवेशन प्रशिक्षण दौरा

| | | | |
|---|---|---|---|
| २०/९/९४ | सोलापूर | ५/१०/९४ | (विश्रांती) |
| २१/९/९४ | उस्मानाबाद | ६/१०/९४ | नाशिक |
| २२/९/९४ | लातूर | ७/१०/९४ | मुंबई |
| २३/९/९४ | बीड | ८/१०/९४ * | धुळे |
| २४/९/९४ | नांदेड | ९/१०/९४ * | जळगाव |
| २५/९/९४ | परभणी | १०/१०/९४ | बुलढाणा |
| २६/९/९४ | जालना | ११/१०/९४ | अकोला |
| २७/९/९४ | औरंगाबाद | १२/१०/९४ | आमरावती |
| २८/९/९४ | अहमदनगर | १३/१०/९४ | (विश्रांती) |
| २९/९/९४ | (विश्रांती) | १४/१०/९४ | यवतमाळ |
| ३०/९/९४ | (विश्रांती) | १५/१०/९४ | वर्धा |
| १/१०/९४ | कोल्हापूर | १६/१०/९४ | चंद्रपूर |
| २/१०/९४ | सांगली | १७/१०/९४ | गडचिरोली |
| ३/१०/९४ | सातारा | १८/१०/९४ | भंडारा |
| ४/१०/९४ | (विश्रांती) | १९/१०/९४ | नागपूर |

*(* धुळे, जळगाव जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनी दौऱ्याच्या तारखांतील बदल लक्षांत घ्यावा.)*

## जिल्हावार कार्यकर्ता बैठकांची पहिली फेरी पूर्ण

शेतकरी संघटनेच्या विदर्भ व मराठवाडा विभागातील जिल्हावार कार्यकर्त्यांच्या बैठका अध्यक्ष श्री. पाशा पटेल, महिला आघाडी अध्यक्षा सौ. सरोज काशीकर, श्री. मोरेश्वर टेमुर्डे, श्री. वामनराव चटप यांच्या उपस्थितीत पार पडल्या असून जिल्ह्या जिल्ह्यांतील कार्यकर्ते नागपूर अधिवेशनाच्या तयारीच्या कामास जोमाने लागले आहेत.

३ सप्टेंबर १९९४ रोजी नागपूर जिल्ह्याच्या नरखेड तालुक्यातील साखरखेडा, मेढला व वाढोणा या गावी बळीराज्य गावाच्या पाटीचे उद्‌घाटन करून शेतकरी संघटनेचे प्रणेते श्री. शरद जोशी यांचा ५९ वा वाढदिवस साजरा करण्यात आला आणि ६ व्या अधिवेशनाच्या नागपूर जिल्हा प्रचारफेरीचा प्रारंभ करण्यात आला. प्रेषक : श्री. राम नेवले.

## परभणीतील तयारी

परभणी जिल्ह्यातील पाथ्री तालुक्यात ताडबोरगाव, देवलगाव अवचार, नामानोली आणि सेलू तालुक्यात कोल्हा, मानवतरोड, डासाळा, चिखलठाणा खु., चिखलठाणा बु., रायपूर, झोडगाव, धनेगाव, डिग्रस बसाले, साळेगाव, सांवगीमगर, शिंदे टाकळी या गावांत २२ जुलै ते ४ ऑगस्ट १९९४ या काळात बळीराज्य गावाचे फलक लावले गेले. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. पुरूषोत्तम लाहोटी यांनी या कार्यक्रमासाठी दौरा केला.

३ सप्टेंबर १९९४ पासून जिंतूर व वसमत तालुक्यातील प्रचार दौरा सुरू झाला असून या प्रचार यात्रेत कर्जमुक्ती व बळीराज्य गावाचे फलक लावण्याचा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमांच्या आधारे शेतकरी संघटना नागपूर अधिवेशनाच्या प्रचाराने परभणी जिल्ह्यात चांगला जोम पकडला आहे.

(प्रेषक : पुरुषोत्तम लाहोटी)

## फॅक्स नंबर बदलला

श्री. शरद जोशी
फोन : ०२१३५-५२२९५/५२३५४
फॅक्स : ०२१३५-५२२९५

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On September 10, 1994

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
September 6, 1994

**PNCW 281**
Licence
to post
without
prepayment
**No. 87**

# संयुक्त अधिवेशन नागपूर

***खुले अधिवेशन : १२ नोव्हेंबर १९९४***

***ठिकाण : कस्तुरचंद पार्क, नागपूर.***

***सायंकाळी ५ वाजता***

**शेतकऱ्यांना हजारो वर्षांच्या आर्थिक गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी**
**खात्रीशीर प्रयत्न करण्याची संधी देणाऱ्या खुल्या व्यवस्थेला अडथळा आणणाऱ्या**
आणि समाजवादाच्या छत्राखाली पोसलेल्या सरकारशाही, नोकरशाही, गुंडपुंडगिरी आणि
सरकारच्या नामर्दपणामुळे उन्मत्त झालेल्या जातीयवादी शक्तींना
निष्प्रभ करण्यासाठी लाखोंच्या संख्येने हजर रहा.

**सौ. सरोज काशीकर**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

**पाशा पटेल**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**श्री. पी. एस्. ठाकरे**
स्वागताध्यक्ष, शे. सं. ६ वे अधिवेशन

**श्री. राम नेवले**
कार्याध्यक्ष, शे. सं. ६ वे अधिवेशन

## नागपूर अधिवेशनानिमित्त कलापथक व वगनाट्य स्पर्धा : खुलासा

इतर वर्तमानपत्रांतील जाहिरातींत चुकून बक्षिसाच्या रकमा कमी लिहिल्या गेल्या आहेत.
बक्षिसाच्या रकमा – पहिले – रु. १०,०००/- दुसरे रु. ५,०००/-, तिसरे रु. २,५००/- स्पर्धेत भाग घेऊन इच्छिणाऱ्यांनी श्री. मोहन गुंजाळ, 'फिनिक्स्', विंचूर रोड, मु. पो. ता. येवला, जि. नाशिक. या पत्त्यावर संपर्क साधावा.

**राम नेवले**, कार्याध्यक्ष, शे. सं. ६ वे अधिवेशन

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**